तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ७ मे २०२५

आतील पानावर
पान २- मला कधीच वडिलांसोबत काम ...
पान ३- यश साकारणार 'रामायण'मध्ये रावण !
पान ४- मी लोकांना खूप अहंकारी वाटते
पान ५- 'अल्लू अर्जुन'च्या सिनेमात 'या' ...
पान ६- सईला हवीय ड्रीम डेट

# रणवीर सिंग 'झोंबी'त दिसणार वेगळ्या अंदाजात

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगकडे सध्या अनेक मोठे प्रोजेक्ट आहेत. तो आदित्य धरच्या 'धुरंधर' चित्रपटाचे चित्रीकरण करत आहे, ज्यामध्ये त्याचा लांब दाढी असलेला लूक चर्चेत आहे. याशिवाय तो फरहान अख्तर दिग्दर्शित 'डॉन ३' चाही एक भाग आहे. तथापि, सर्वात रोमांचक बातमी अशी आहे की रणवीर लवकरच एका झोम्बी चित्रपटात दिसणार आहे, जो तो त्याच्या निर्मिती कंपनी माँ कसम फिल्म्स अंतर्गत तयार करणार आहे.

रणवीर त्याच्या झोम्बी चित्रपटावर जोमाने काम करत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन जय मेहता करणार आहेत. सध्या हा प्रकल्प सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि पटकथेवर काम सुरू आहे. रणवीर स्वतः पटकथेबाबत आपले सूचना देत आहे आणि वर्षाच्या अखेरीस पटकथेला अंतिम स्वरूप मिळेल अशी आशा करत आहे. रिपोर्टनुसार, जर सगळं काही व्यवस्थित झालं तर डॉन ३ नंतर हा त्याचा पुढचा चित्रपट असू शकतो. परंतु अजूनही काहीही निश्चित झालेले नाही. 'धुरंधर'मध्ये रणवीरसोबत संजय दत्त, अक्षय खन्ना, अर्जुन रामपाल आणि आर माधवनसारखे स्टार्स दिसणार आहेत.

या चित्रपटाची घोषणा जुलै २०२४ मध्ये करण्यात आली होती. या चित्रपटात १९७० आणि १९८० च्या दशकातील भारतीय गुप्तचर संस्थांचे जग दाखवण्यात येईल. या चित्रपटाचे चित्रीकरण मे पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, परंतु प्रदर्शनाची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.





# मला कधीच वडिलांसोबत काम करायचे नव्हते



'छावा' चित्रपटात औरंगजेबाच्या भूमिकेने पुन्हा एकदा सर्वांची मने जिंकणारा अभिनेता अक्षय खन्ना म्हणतो की, 'त्याला कधीही त्याचे वडील विनोद खन्ना यांच्यासोबत काम करायचे नव्हते आणि तो कधीही अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करू इच्छित नाही.' असं स्वतः अभिनेता म्हणाला आहे. अक्षयची गणना बॉलिवूडमधील सर्वात प्रतिभावान अभिनेत्यांमध्ये केली जाते. एका जुन्या मुलाखतीत अक्षय म्हणाला होता की, त्याचे वडील विनोद खन्ना आणि अभिनेते अमिताभ बच्चनसारख्या कलाकारांची पडद्यावर इतकी मजबूत उपस्थिती आहे की त्यांच्यासोबत काम करणे कठीण आहे. अक्षय म्हणाला, माझ्या वडिलांसारखा पडद्यावर प्रभाव पाडणे सोपे नाही. फक्त काही लोकांमध्येच हा गुण असतो आणि माझ्याकडे तो नाही. अशी भावना त्याने व्यक्त केली. अक्षयने बायोपिक चित्रपटांबद्दलही सांगितले. तो म्हणाला की, खऱ्या व्यक्तीची भूमिका साकारणे खूप आव्हानात्मक आहे कारण ते अगदी अचूकपणे करावे लागते. २००७ मध्ये आलेल्या 'गांधी, माय फादर' या चित्रपटात अक्षयने महात्मा गांधींचा मुलगा हिरालाल गांधी यांची भूमिका साकारली होती. अलीकडेच २०२५ मध्ये आलेल्या 'छावा' चित्रपटात त्यांनी मुघल शासक औरंगजेबाची भूमिका साकारली होती, जो ब्लॉकबस्टर ठरला. अक्षय शेवटचा 'छावा'मध्ये विकी कौशल आणि रश्मिका मंदान्नासोबत दिसला होता. आता तो रणवीर सिंगसोबत 'धुरंधर' चित्रपटात दिसणार आहे, ज्याचे चित्रीकरण सुरू आहे. हा चित्रपट ॲक्शन, ड्रामा आणि सस्पेन्सने भरलेला असेल. चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. अक्षयची सोशल मीडियावर फॅन फॉलोविंग लाखोंच्या घरात आहे.

# धनश्री करणार सिनेसृष्टीत पदार्पण



आघाडीचा फिरकीपटू युझवेंद्र चहल आणि इन्स्टाग्रामवरील स्टार धनश्री वर्मा यांनी काही दिवसांपूर्वी एकमेकांपासून वेगळं होण्याचा निर्णय घेत घटस्फोट घेतला होता. घटस्फोटानंतर युझवेंद्र चहल सध्या आयपीएलमध्ये खेळत आहे. तर चहलशी नातं तुटल्यानंतर धनश्रीनेही जुन्या आठवणी मागे टाकून पुढे जाण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, घटस्फोटानंतर धनश्री वर्माचं नशीब फळफळलं असून, ती लवकरच सिनेसृष्टीत कलाकर म्हणून पदार्पण करणार आहे. धनश्री ही लवकरच तेलुगू चित्रपट निर्माते दिल राजू यांच्या आकाशम दति वास्तव या चित्रपटामध्ये दिसणार आहे. या चित्रपटात धनश्री पहिल्यांदाच अभिनय करताना दिसणार आहे. तत्पूर्वी धनश्री वर्मा ही अनेक म्युझिक व्हिडिओंमध्ये दिसली आहे. तसेच त्यात तिने थोडाफार अभिनय केलेला आहे. मात्र या चित्रपटात ती डान्ससोबत अभिनयही करणार आहे. धनश्री वर्मा हिच्या या चित्रपदाचं दिग्दर्शन शशी कुमार हे करत आहेत. तसेच या चित्रपटामध्ये सगळ्या नव्या दमाच्या कलाकारांना संधी देण्यात आली आहे. दक्षिणेतील कोरियोग्राफर यश हा या चित्रपटात मुख्य भूमिकेमध्ये दिसणार आहे.

# बिपाशा बसू 'रेस ४' मध्ये झळकणार?



बॉलिवूड अभिनेत्री 'बिपाशा बसू' बऱ्याच काळापासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. अलिकडेच बिपाशाने तिच्या इंस्टाग्राम पेजवर 'रेस' चित्रपटाशी संबंधित एक जुना व्हिडिओ शेअर केला आहे. अभिनेत्री लवकरच कोणत्या सिनेमात झळकणार? असा सवाल चाहते करत आहेत. २००८ साली प्रदर्शित झालेल्या 'रेस' सिनेमात अभिनेत्री बिपाशा ही सैफ अली खानसोबत दिसली होती. अलिकडेच 'रेस ४' बद्दल चर्चा रंगली असताना बिपाशाने सोशल मीडियावर पोस्टदेखील शेअर केली आहे. यातून बिपाशा 'रेस ४' चित्रपटाचा भाग होणार का? याचे संकेत दिसून आले आहेत.

बिपाशाने इंस्टाग्रामवर 'रेस' चित्रपटातील 'रेस सॅन्सन की' हे गाणे शेअर केले आहे. बिपाशाला हे गाणं पुन्हा एकदा का आठवतंय? बिपाशाने याबद्दल कोणतेही कॅप्शन किंवा संदेश लिहिलेला नाही. असे दिसते की ती 'रेस ४' चित्रपटाच्या निर्मात्यांना एक इशारा देऊ इच्छिते. आणि आपण देखील या सिनेमाचा एक भाग असल्याचे अभिनेत्री सांगताना दिसत आहे. मात्र, आता लवकरच अभिनेत्रीच्या या सस्पेन्सवरून पडदा उठण्याची शक्यता आहे. दरम्यान, 'रेस (२००८)' चित्रपटात बिपाशाने सोनियाची भूमिका साकारली होती. 'रेस ४' मध्ये एक नवीन एन्ट्री होणार आहे. निर्मात्यांनी असेही पुष्टी केली की सैफ अली खान व्यतिरिक्त सिद्धार्थ मल्होत्रा देखील चित्रपटात दिसणार आहे. चित्रपट निर्मात्यांनी इतर कोणत्याही अभिनेत्याचे नाव फायनल केलेले नाही. बिपाशाबद्दल बोलायचे झाले तर, ती चित्रपटांमध्ये कमी दिसू लागली आहे. 'रेस' चित्रपटातील गाणे शेअर करून, बिपाशा पुन्हा चित्रपटांमध्ये परतण्याचा विचार करत असेल अशी शक्यता आहे.



# ज्युनियर एनटीआरच्या 'या' सिनेमाची रिलीज डेट जाहीर !

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता ज्युनियर एनटीआर हा त्याच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकतो. अनेक हिट चित्रपटांमध्ये ज्युनियर एनटीआरनं काम केलं आहे. फक्त साऊथच नव्हे तर जगभरात तो चांगलाच लोकप्रिय आहे. मागील बऱ्याच दिवसांपासून 'एनटीआरनील' असे तात्पुरते शीर्षक असलेल्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाबाबत जाणून घ्यायला ज्युनियर एनटीआरचे चाहते आतुर झाले आहेत. अशातच या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख घोषित करण्यात आली आहे. पुढल्या वर्षी २५ जून रोजी हा ॲक्शन- ड्रामा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या कथानकाबाबत अद्याप काहीही सांगण्यात आलेले नाही. या चित्रपटाचे दिग्दर्शन 'सालार पार्ट १- सीजफायर' फेम प्रशांत नील करत आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने एनटीआर आणि नील रुपेरी पडद्यावर काहीतरी भव्य दिव्य सादर करण्यासाठी सज्ज झाले आहेत. या चित्रपटात एनटीआरसोबत कोणती अभिनेत्री झळकणार हे देखील सध्या गुलदस्त्यातच आहे. 'एनटीआरनील' या सिनेमाशिवाय अभिनेता 'वॉर-२-'मध्ये पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या वॉर या चित्रपटाचा सिक्वेल आहे. वॉर चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंदने केले होते. आता 'वॉर-२'हा चित्रपट पुढील १५ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार असल्याची चर्चा आहे. तर ज्युनिअर एनटीआर शेवटचा 'देवरा' या चित्रपटात दिसला होता. या सिनेमात त्यानं पहिल्यांदाच अभिनेत्री जान्हवी कपूरसोबत स्क्रीन शेअर केली होती. पण, हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप गेला. आता आगामी दोन्ही चित्रपटाकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत.

# यश साकारणार 'रामायण'मध्ये रावण !

'केजीएफ' नितेश तिवारींच्या 'रामायण' सिनेमाची अनेक दिवसांपासून चर्चा आहे. रणबीर कपूर प्रभू श्रीराम तर साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. दोघंही काही महिन्यांपासून सिनेमाचं शूट करत आहेत. दरम्यान सिनेमात साऊथ सुपरस्टार यश रावणाची भूमिका साकारणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार त्याने सिनेमाच्या शूटिंगला सुरुवातही केली आहे. मुंबईतील फिल्मसिटीत रावणाचा दरबार उभारण्यात आला आहे.

'रामायण' सिनेमात यश रावणाच्या भूमिकेत दिसणार यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. शूटिंग सुरु करण्यापूर्वी यशने उज्जैनच्या महांकाळेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यशने मुंबईत शूटिंगला सुरुवात केली आहे. तो पुढील एक महिना मुंबईतच राहणार आहे. यादरम्यान सिनेमाचा महत्वाचा भाग शूट होणार आहे. फिल्म सिटीमध्ये सिनेमाचं शूट सुरु असून भव्य सेट उभारण्यात आले आहेत. रावणाची लंका फिल्मसिटीत सजलेली आहे. यशच्या एन्ट्रीने चाहत्यांमध्येही सिनेमाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. सिनेमात अभिनेता सनी देओल हनुमानाच्या भूमिकेत दिसणार आहे. अद्याप सनीने शूट सुरु केलेलं नाही मात्र काही दिवसांपूर्वीच त्याने आपल्या भूमिकेवर भाष्य केलं होतं. हा सर्वात मोठा सिनेमा बनेल अशी त्याने प्रतिक्रिया दिली होती. 'रामायण' सिनेमा दोन भागांमध्ये बनणार आहे. पहिला भाग पुढील वर्षी २०२६ मध्ये रिलीज होईल अशी शक्यता आहे. सिनेमात लारा दत्ता कैकयी आहे तर रवी दुबे लक्ष्मणाच्या भूमिकेत आहे. अजिंक्य देव, आदिनाथ कोठारेसह आणखी काही कलाकारांचीही भूमिका आहे.





# चाहत्याने बांधले समांथा रुथ प्रभूचे मंदिर

सुपरस्टार अभिनेत्री समांथा रुथ प्रभू तरुणाईत अत्यंत प्रसिद्ध आहे. ती दिसायला सुंदर आहेच पण तिचा अभिनय सुद्धा तिच्या सौंदर्याला साजेसा असाच आहे. दाक्षिणात्य इंडस्ट्रीसह समांथानं बॉलिवूडमध्ये स्थान निर्माण केलं आहे. परदेशातही समांथाचा मोठा चाहतावर्ग आहे. अशातच आता समांथा हिचा एक चाहता चर्चेत आला आहे. यामागचे कारण म्हणजे या चाहत्याचं अभिनेत्रीवर इतके प्रेम आहे की त्याने चक्क तिचे मंदिर बांधले आहे. समांथाच्या एका जबऱ्या चाहत्यानं आंध्र प्रदेशातील बापटला जिल्ह्यातील अलापाडू गावात तिचे मंदिर बांधले आहे. या मंदिरामध्ये त्याने समांथाची मूर्ती बसवली आहे. समांथाच्या या चाहत्याचं नाव संदीप असं आहे. नुकतंच समांथाचा वाढदिवस झाला. तिच्या वाढदिनी संदीपनेदेखील मंदिरात पूजा आणि केक कापला. संदीपची पत्नी दीप्तीचा देखील यात सक्रिय सहभाग होता. सध्या समांथाच्या या चाहत्याची चर्चा होत आहे. समांथाबद्दल तो म्हणाला, मी समांथाचा मोठा फॅन आहे. गेल्या तीन वर्षापासून मी समांथाचा वाढदिवस साजरा करतोय. समांथाची परोपकाराची वृत्ती मला प्रेरणा देते. समांथाचा अभिनय आणि विशेषतः तिच्या 'प्रत्युषा सपोर्ट' या चॅरिटी फाउंडेशनमुळे संदीपच्या मनात तिच्याबद्दल आदर निर्माण झाला. समांथा 'प्रत्युषा सपोर्ट'च्या माध्यमातून मुलांच्या हृदयविकाराच्या उपचारांसाठी मदत करते. समांथाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर ती लवकरच 'रक्त ब्रह्मांड'मध्ये दिसणार आहे. या सीरिजमध्ये आदित्य रॉय कपूर आणि वामिका गब्बी देखील दिसणार आहेत. याआधी समांथा 'सिटाडेल हनी बनी'मध्ये पाहायला मिळाली होती. यासोबतच समांथा तिच्या आजारपणामुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होती. समांथापासून घटस्फोट घेतल्यानंतर नाग चैतन्य याने अभिनेत्री शोभिता धुलिपालासोबत लग्नगाठ बांधली. तर दुसरीकडे समांथा मात्र एकटीच होती. मात्र, अशातच आता अभिनेत्री लोकप्रिय निर्माता आणि दिग्दर्शक राज निदिमोरू याला डेट करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. पण, या चर्चांना अभिनेत्री किंवा राजनं दुजोरा दिलेला नाही.




# अजय देवगणसोबत झळकणार तमन्ना

दिग्दर्शक जगत शक्ति यांच्या आगामी चित्रपटात तमन्ना भाटिया दिसून येणार आहे. या चित्रपटात तिच्यासोबत अजय देवगण आणि संजय दत्त देखील असणार आहेत. या चित्रपटाचे चित्रिकरण लवकरच सुरू होणार आहे. हा एक ॲक्शन ड्रामापट असणार आहे. या चित्रपटाची अधिकृत घोषणा झालेली नाही. या चित्रपटाचे नाव तात्पुरते 'रेंजर' ठेवण्यात आले आहे. याची निर्मिती लव फिल्म्सकडून केली जात आहे. या कंपनीने यापूर्वी 'दे दे प्यार दे' चित्रपटाची निर्मिती केली होती. तर नव्या चित्रपटात संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत असणार आहे. तमन्ना लवकरच याचे चित्रिकरण अजय अन् संजय दत्तसोबत सुरू करणार आहे. या चित्रपटातील तमन्नाला महत्त्वाची भूमिका देण्यात आली आहे. तमन्नाने दिग्दर्शक जगन शक्तिसोबत पटकथेवर अनेकदा चर्चाही केली आहे. चित्रपटात आणखी काही मोठे कलाकार असणार आहेत, परंतु त्यांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. हा चित्रपट पुढील मोठ्या स्तरावर प्रदर्शित केला जाणार आहे.

# बाबील खानला करायचाय रोमँटिक-कॉमेडी सिनेमा

ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेता इरफान खान यांचा मुलगा बाबिल खानही हळूहळू त्याच्या प्रोजेक्ट्सद्वारे बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. अलिकडेच बाबिल ओटीटीवर प्रदर्शित झालेल्या 'लॉगआउट' चित्रपटात दिसला होता. यामध्ये त्याने सोशल मीडिया इन्फ्लुएंसरची भूमिका साकारली होती. आता बाबिलने त्याच्या पुढच्या प्रोजेक्टबद्दल सांगितले आहे. यासोबतच त्याने कोणत्या प्रकारचा चित्रपट करायचा आहे हे देखील सांगितले आहे. अलीकडेच झालेल्या संभाषणात बाबिलने त्याच्या आगामी प्रोजेक्टबद्दल आणि त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील रोमान्सबद्दल सांगितले. बाबिलने सांगितले की, त्याचा पुढचा प्रोजेक्ट एक रोमँटिक शो आहे. तो म्हणाला, मला रोमँटिक कॉमेडी शैलीमध्ये खूप रस आहे. मला खरोखर रोमँटिक- कॉमेडी करायची आहे. मी आता एका रोमँटिक-कॉमेडीवर काम करत आहे. तथापि, बाबिलने त्याच्या पुढच्या प्रोजेक्टबद्दल जास्त माहिती दिली नाही. परंतु हे निश्चित आहे की त्याचा पुढचा प्रोजेक्ट रोमँटिक- कॉमेडीचा आहे. या संभाषणादरम्यान बाबिलने त्याच्या खऱ्या आयुष्यातील प्रेमाबद्दल आणि त्याच्या आयुष्यातील रहस्यांबद्दलही सांगितले. तो म्हणाला की माझे रहस्य माझ्या फोनवर नाहीत. माझे सर्व रहस्य माझ्या हृदयात आहेत. जर माझे हृदय चोरीला गेले, जे सहसा घडते. तर सर्व गुपिते कळू शकतात. बाबिलने इंडस्ट्रीत फारसे काम केलेले नाही. पण छोट्या कारकिर्दीत तो वेगवेगळ्या भूमिका साकारत आहे. बाबिलला आव्हानात्मक भूमिका साकारायच्या आहेत. जे त्याच्या फिल्मोग्राफीमध्ये देखील दिसून येते. ज्यामध्ये 'काला' पासून 'द रेल्वे मॅन' आणि 'लॉगआउट' पर्यंतच्या वेगवेगळ्या पात्रांचा समावेश आहे.



# मी लोकांना खूप अहंकारी वाटते



'बिग बॉस मराठी'च्या ५ व्या पर्वाची चांगलीच चर्चा झाली होती. या पर्वात निक्कीने सहभाग घेतला होता. त्याआधी ती हिंदी 'बिग बॉस' मध्येही दिसली होती. हिंदीसह मराठी 'बिग बॉस' मधील तिच्या विधानांची बरीच चर्चा झाली होती. विशेष म्हणजे अभिनेत्री वर्षा उसगावंकर यांच्यासह झालेल्या वादानंतर सोशल मीडियावर देखील तिची चर्चा रंगली. अशातच नुकतच निक्कीने एका मुलाखतीमध्ये तिने तिच्या स्वभावाबद्दल सांगितलं आहे. तिने म्हटलं आहे की, लोकांना वाटतं मी खूप अहंकारी आहे पण तसं नाहीये. माझ्यासाठी माझं कुटुंब, माझं काम, माझे पाळीव प्राणी आणि देव याच गोष्टी महत्त्वाच्या आहेत. या व्यतिरिक्त मी इतर कुठल्याही गोष्टीला फार महत्त्व देत नाही. त्यामुळे लोकांना असं वाटतं की मी अहंकारी आहे पण खरंतर तसं नाहीये त्यांना माझ्याबद्दलचा गैरसमज आहे. निक्कीच्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर तिने २०१९ साली आलेल्या चिकाटी गाडीलो चिथाकोतुडू या तेलगू हॉरर-कॉमेडी चित्रपटातून पदार्पण केलं होतं. यासह त्याच वर्षी ती 'कांचना ३' या प्रसिद्ध तामिळ चित्रपटात झळकली होती. पुढे ती हिंदी 'बिग बॉस' च्या १४व्या पर्वात सहभागी झाली होती. निक्की 'खतरो के खिलाडी' या कार्यक्रमातही झळकली होती. तर नुकतच निक्की 'सोनी' वाहिनीवरील 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या कार्यक्रमात पाहायला मिळाली. या कार्यक्रमादरम्यान ती विविध पदार्थ बनवताना दिसली. निक्की या कार्यक्रमाच्या अंतिम फेरीतही पोहोचली होती. परंतु अभिनेता गौरव खन्ना या कार्यक्रमाचा विजेता ठरला आणि निक्की दुसऱ्या क्रमांकाची दावेदार ठरली. आता निक्की 'स्टारप्रवाह'वरील 'शिट्टी वाजली रे' या कार्यक्रमातून पाहायला मिळत आहे.

# 'अल्लू अर्जुन'च्या सिनेमात 'या' अभिनेत्रींची होणार एन्ट्री!


अभिनेता अल्लू अर्जुनने 'पुष्पा २' मधून १८०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. आणि आता, त्याने त्याच्या पुढच्या चित्रपटाची घोषणा केली आहे, जो अ‍ॅटलीसोबत आहे. या चित्रपटाचे तात्पुरते शीर्षक " A22 X -6.' असं असलं तरी, चित्रपटाचे बजेट मात्र ८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. त्याच वेळी, हा चित्रपट मोठ्या पातळीवर बनवला जाईल. हॉलिवूडमधील अ‍ॅक्शन डायरेक्टर्सना भेटण्याचे हेच कारण आहे. बरं, या चित्रपटाबद्दल आधी माहिती होती की प्रियंका या चित्रपटात झळकरणार आहे. आता आणखी दोन बॉलिवूड अभिनेत्रींच्या नावांची चर्चा सुरू आहे. या चित्रपटात दोन अभिनेत्री असतील, त्यापैकी एक कियारा असेल असे नियोजित आहे. तर, जान्हवी कपूरचेही नाव पुढे येत आहे. काहीदिवसांपूर्वीच जान्हवी कपूरचा ज्युनियर एनटीआरसोबतचा 'देवरा' प्रदर्शित झाला होता. तर दुसरीकडे, ती लवकरच राम चरणसोबत बुची बाबूच्या चित्रपटात दिसणार आहे. दरम्यान, कियारा आणि राम चरण यांचा गेम चेंजर चित्रपट खूपच फ्लॉप ठरला होता. सर्वांना माहित आहे की अल्लू अर्जुन आणि राम चरण हे चुलत भाऊ आहेत. खरंतर कियारा अडवाणी आई होणार आहे. तिने काही काळापूर्वी तिच्या गरोदरपणाची घोषणा केली. अशा परिस्थितीत, तिने डॉन ३ सिनेमा सोडल्याची चर्चा आहे. आणि ती आधीच दुसऱ्या सिनेमांवर काम करत आहे. त्यानंतर ती प्रसूती सुट्टी घेईल. अशा परिस्थितीत, अल्लू अर्जुन आणि अ‍ॅटली कियाराची वाट पाहणार आहेत का? दुसऱ्या अभिनेत्रीचा शोध घेतील हे पाहणे महत्वाचे आहे. खरंतर, प्रियांका चोप्रा सध्या महेश बाबू आणि राजामौली यांच्या "SSMB29' या चित्रपटावर काम करत आहे. अलीकडेच असे उघड झाले की तिला हृतिक रोशनच्या क्रिश ४ साठी देखील लॉक करण्यात आले आहे. ती या चित्रपटात दिसणार आहे. तिच्या वेळापत्रकाच्या अडचणीमुळे, तिने नकार दिल्याचं सांगितलं जात आहे.





# राजकुमारच्या 'मालिक'साठी करावी लागणार प्रतीक्षा

बॉलिवूड इंडस्ट्रीला एकामागोमाग सुपरहिट सिनेमे देऊन अभिनेता राजकुमार राव प्रसिद्धीझोतात आला. लवकरच राजकुमार राव 'मालिक' या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांमधील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मात्र, अशातच या चित्रपटाच्या संदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. 'मालिक' चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या मुळ तारखेत बदल करण्यात आला आहे. याची माहिती खुद्द अभिनेता राजकुमारने सोशल मीडियाद्वारे दिली आहे. 'मालिक' हा चित्रपट २० जून २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार होता. त्यानंतर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख ११ जुलै करण्यात आली आहे. यासंबंधित राजकुमारने 'मालिक' चित्रपटातील त्याची पोस्टरचा एक फोटो शेअर केला आहे. रौब, रुतबा, और राज होगा मालिक का, ११ जुलाई से आ रहें है मालिक ११ जुलै से सिनेमाघरों में...,अशी पोस्ट त्याने इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. त्यामुळे आता राजकुमार रावच्या चाहत्यांना 'मालिक' चित्रपटासाठी आणखी वाट पाहावी लागणार आहे. राजकुमार राव यांच्या 'मालिक' चित्रपटाची कथा सामाजिक मुद्द्यांवर आधारित असल्याचं सांगितलं जात आहे. मालिकमध्ये तो एका पहिल्यांदाच गँगस्टरच्या भूमिकेत दिसणार आहे.



# शाह बानो प्रकरण रूपेरी पडद्यावर

'शाह बानो' प्रकरणावर चित्रपट येणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतम आणि इमरान हाशमी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर २०२५ मध्ये चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. शाह बानो हे अत्यंत संवेदनशील प्रकरण असून हा चित्रपट १९८५ च्या केसवर आधारित आहे. देशातील मुस्लिम महिलांच्या अधिकार आणि वाद अशा प्रकरणावर ही कथा आहे. चित्रपटाचे पहिले शेड्यूल पूर्ण जाले असून पुढील टप्पा सुरु आहे. पहिल्यांदा उत्तर प्रदेश किंवा लखनौ येथे चित्रपटगृहात हा चित्रपट प्रदर्शित होईल. यामी गौतम शाह बानोची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाची कथा अशा केसवर आधारित आहे, जी एका मुस्लिम महिलेला तिच्या पतीकडून घटस्फोटानंतर उदरनिर्वाहासाठी भत्ता मिळावा यासाठी कायदेशीर लढाई लढते. हाच या चित्रपटाचा केंद्रबिंदू असून शाहबानोचा हा केवळ वैयक्तिक लढा नव्हता, तर देशभरातील अनेक मुस्लिम महिलांच्या न्यायासाठीचा लढा होता. इमरान हाशमी एका वकिलाच्या भूमिकेत असेल. तो शाह बानोच्या बाजून कोर्टात लढा देताना दिसेल. चित्रपटात ७० आणि ८०च्या दशकातील पृष्ठभूमी दाखवण्यात येईल. एक महिला आपल्या अधिकारासाठी संपूर्ण समाज आणि व्यवस्थेशी संघर्ष करते. यामी एक साहसी महिलेच्या भूमिकेत असेल. यामीने 'आर्टिकल ३७०' मध्ये परफॉर्मन्स दिला होता. इमरान हाशमी देखील 'ग्राउंड जीरो' मध्ये एक बीएसएफ ऑफिसरच्या रूपात दिसणार आहे.



## 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!' सिनेमाची घोषणा



महाराष्ट्र दिनाच्या मुहुर्तावर महेश मांजरेकरांनी त्यांच्या नव्या सिनेमाची घोषणा केली आहे. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!' असं या सिनेमाचं नाव आहे. नवीन कथा आणि नव्या कलाकारांसह महेश मांजरेकर हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आणणार आहेत. मी शिवाजीराजे भोसले बोलतोय सिनेमात महेश मांजरेकरांनी छत्रपती शिवरायांची भूमिका साकारली होती. 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!' सिनेमात मात्र शिवराय साकारताना सिद्धार्थ बोडके दिसणार आहे. चित्रपटात त्याच्यासोबत बालकलाकार त्रिशा ठोसरही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या या चित्रपटाचे लेखन अंतिम टप्प्यात असून, चित्रीकरण लवकरच सुरु होईल. महेश मांजरेकर यांचे दिग्दर्शन, कथा लेखन असलेल्या या चित्रपटाचे संवादलेखन सिद्धार्थ साळवी यांनी केले आहे. आजच्या महाराष्ट्रातील मूलभूत प्रश्नांवर चित्रपटात भाष्य करण्यात येणार आहे, जे प्रश्न गेल्या काही दशकांपासूनही अनुत्तरितच आहेत. हे माझ्या महाराष्ट्राचं भविष्य आहे. यांच्या भावनांशी खेळलात, तर याद राखा... गाठ माझ्याशी आहे. या शिवगर्जनेच्या सोबतीने 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!' या चित्रपटाचा उद्देश स्पष्ट होतो. हा केवळ ऐतिहासिक चरित्रपट न राहाता, आधुनिक महाराष्ट्राला त्याच्या मूळ विचारांकडे परत नेण्याचा प्रयत्न असून हा सिनेमा ऐतिहासिक व्यक्तिरेखेचा गौरव करतानाच, समाजातील निष्क्रियतेला जाबही विचारणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने महेश मांजरेकर पुन्हा एकदा एक संवेदनशील तरीही ठाम भूमिका घेत आहेत, की इतिहासातील आदर्श हे केवळ गौरवगाथा म्हणून सांगायचे नसतात, तर ते वर्तमानाला दिशा देण्यासाठी पुन्हा पुन्हा आठवावे लागतात.

# भरत जाधवांची मुलं सिने इंडस्ट्रीपासून दूर

मराठी सिनेसृष्टीत अनेक कलाकारांची पुढची पिढीही सध्या कार्यरत आहे. प्रिया बेर्डे, केदार शिंदे, सचिन पिळगावकर, रमेश-सीमा देव, लोकेश गुप्ते अशा अनेक कलाकारांची मुलं आज मराठी मनोरंजन विश्वात स्वतःचं नाव कमवत आहेत. पण काही कलाकार याविषयी अपवादही असतात. असेच कलाकार म्हणजे भरत जाधव. मराठी सिनेसृष्टी स्वतःचं नाव कमावणारे भरत जाधव यांची दोन्ही मुलं इंडस्ट्रीपासून दूर आहेत. भविष्यात ते मनोरंजन विश्वात सक्रीय दिसणार का, याविषयी विचारलं असता भरत जाधव काय म्हणाले जाणून घ्या... एका मुलाखतीत भरत जाधव यांना त्यांची दोन्ही मुलं आगामी काळात मनोरंजन सृष्टीत दिसणार का? असा प्रश्न विचारला असता भरत जाधव म्हणाले की, काही संबंध नाही. आताच नाही तर, लहान असताना पण मी आणि बायको कोणत्या कार्यक्रमाला जात असू तर आम्ही त्यांनाही विचारायचो की, चला जाऊया आपण. तर ते नाही म्हणायचे. तुम्ही जा, असं सांगायचे आम्हाला. ते दोघेही तसेच आहेत. ग्लॅमर दुनियेपासून ते लांब आहेत. एवढंच काय, ते जेव्हा शाळेत होते, तेव्हा त्यांना सोडायला गाडी जायची. तेव्हा गाडीपण ते दोघं लांब उभी करायला लावायचे. शाळा सुटल्यावर सुद्धा एके ठिकाणी गाडी उभी असायची. मग ते दोघे चालत तिथे गाडीपर्यंत यायचे. आणि मग गाडीत बसून घरी यायचे. तेव्हापासून ते दोघे अलिप्त आहेत. अलिप्त म्हणजे त्यांना ग्लॅमर वगैरे नको असतं. त्यापासून ते दूर आहेत. अशाप्रकारे भरत जाधव यांनी त्यांच्या मुलांविषयी खुलासा केला. भरत यांना आरंभ हा मुलगा असून सुरभी ही मुलगी आहे. भरत जाधव यांची भूमिका असलेला 'आता थांबायचं नाय' हा सिनेमा नुकताच रिलीज झाला आहे.



## हेमंतने केली नव्या चित्रपटाची घोषणा


मराठी सिनेसृष्टीतील सध्याच्या आघाडी अभिनेत्यांपैकी एक म्हणजे हेमंत ढोमे. हेमंतने आपल्या अभिनयासह दिग्दर्शनाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. हेमंत निर्मितीची धुरा देखील उत्तमरित्या सांभाळतो. हेमंत ढोमेने नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. 'क्रांतीज्योति विद्यालय- मराठी माध्यम' असं त्यांच्या नव्या चित्रपटाचं नाव आहे. हेमंतने सोशल मीडियावर या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. क्षिती जोगच्या चलचित्र मंडळी या निर्मिती संस्थेचा हा पाचवा सिनेमा असणार आहे. मराठी शाळांमधील शिक्षण पद्धती, मातृभाषेत शिकण्याचे महत्व अधोरेखित करणारा हा चित्रपट मनोरंजन करताना विचार करायला लावणारा ठरेल. शिक्षण क्षेत्रातील बदल, मराठी शाळांची कमी होणारी संख्या आणि मातृभाषेच्या माध्यमातून होणाऱ्या जडणघडणीवर हा चित्रपट प्रकाश टाकणार आहे. हेमंतने याआधी 'झिम्मा', झिम्मा २', 'फसक्लास दाभाडे' या गाजलेल्या चित्रपटाद्वारे संवेदनशील विषय मनोरंजनाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले होते. आता 'क्रांतीज्योति विद्यालय- मराठी माध्यम' हा एक वेगळा सामाजिक विषय प्रेक्षकांसाठी ते घेऊन येत आहे. या नव्या चित्रपटाविषयी सांगताना ढोमे म्हणाला, मराठी माध्यमातून मिळालेलं शिक्षण हे माझं बळ ठरलं, अडथळा नाही. मातृभाषेत शिकल्यामुळे माझी संस्कृती, परंपरा आणि माणसं समजली आणि याच जडणघडणीचा अभिमान मी जगभर मिरवू शकलो.

## सईला हवीय ड्रीम डेट



लावणीच्या अभिनेत्री सई ताम्हणकर तिच्या बोल्ड बिनधास्त स्वभावासाठी ओळखली जाते. आजवर तिने अनेक चित्रपट, वेब सीरिजमध्ये वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर तिच्या अभिनयाची छाप सोडली आहे. तर नुकताच सईचा 'गुलकंद' हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित झाला आहे. 'गुलकंद' हा चित्रपट दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांनी दिग्दर्शित केला असून, त्यामध्ये सई ताम्हणकर व समीर चौघुले मुख्य भूमिकांत आहेत. अशातच चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान सई अनेक मुलाखती देताना दिसली. यावेळी तिने एका मुलाखतीत तिच्या ड्रीम डेटबद्दल सांगितलं आहे. मुलाखतीमध्ये चित्रपटातील कलाकारांना 'तुमच्यासाठी डेटची व्याख्या काय आहे', असा प्रश्न विचारला गेला होता. त्यावर प्रसाद ओक, समीर चौघुले, ईशा डे यांनी त्यांची मतं मांडली; परंतु यावेळी सईनं दिलेल्या उत्तरानं मात्र सगळ्यांचं लक्ष वेधलं. सईनं यावर म्हटलं, मला असं खूप आवडेल की, मी जिथे आहे तिथे एक बॉक्स आलाय, ज्यामध्ये एक खूप सुंदर ड्रेस असेल आणि त्यात लिहिलं असेल की, मी ८ वाजता तुला नेण्यासाठी येईन. तू तयार राहा. पण, कुठे जायचं आहे हे मला माहीत नसेल. अशा डेटवर जायला मला खूप आवडेल. सईचं हे उत्तर ऐकल्यानंतर समीर चौघुले तिला गमतीत तुला माहीत आहे का हे ऐकल्यावर केवढे बॉक्स येतील तुला असं म्हणताना दिसले. तर 'गुलकंद' या चित्रपटातून सई ताम्हणकर व समीर चौघुले पहिल्यांदाच एकत्र मुख्य भूमिकांत काम करताना दिसत आहे. या चित्रपटात सई, समीरसह प्रसाद ओक, ईशा डे हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांत पाहायला मिळत आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी कलाकारांसह निर्मातेही चित्रपटाचं जोरदार प्रमोशन करताना दिसले. तर १ मे महाराष्ट्र दिनी हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. दरम्यान, सईच्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर ती मराठीसह हिंदीतही बऱ्यापैकी सक्रिय असते. मराठी-हिंदी अशा दोन्ही भाषांतील वेब सीरिज, चित्रपटांमध्येही तिनं महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. सध्या सई आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. तर नुकतीच सई श्रीदेवी प्रसन्न, मानवत मर्डर्स, डब्बा कार्टेल, देवमाणूस यांसारख्या वेब सीरिज व चित्रपटांमध्ये झळकली होती.

## 'मेरे देश की धरती...'
# गीतकार गुलशन बावरा



**'मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती.. मेरे देश की धरती. हे गाणे रजतपटावर सादर करणारे ज्येष्ठ कलाकार मनोज कुमार नुकतेच काळाच्या पडद्याआड गेलेत. मनोजकुमारची ओळख ठरणाऱ्या या देशाभिमान जागृत करणार्‍या गीताचे जनक गुलशन बावरा. या कविश्रेष्ठाला मात्र लोक विसरले! पडद्याआड कामे करणार्‍या कलाकारांची ओळख तशीही रसिकांना नसतेच. गुलशन बावराचा गीतकार म्हणून कलाजीवनाचा परमोच्च बिंदू म्हणजेही हे गाणे आहे. या गाण्याच्या निर्मितीसंबंधी गुलशन-ने एक मजेदार किस्सा सांगितला; तो वाचण्यात आला. खरे तर हे गाणे देशभक्तीपर लिहिलेच नव्हते. ऐकून आश्चर्य वाटेल, पण हे गाणे युवा-युवतीच्या शाब्दिक छेडछाडीच्या प्रसंगासाठी लिहिले होते. पुरुषांच्या तोंडची कडवी 'डार्क स्ट्रीट' चित्रपटात रफी व सुमन कल्याणपूरच्या आवाजातील गाण्यात दुरुस्ती करून वापरली. म्हणूनच बदल कसा करता येतो. यासाठी हा खटाटोप केला. उरलेल्या गाण्यात देशभक्तीचे भाव होते, ते मनोज कुमारला फारच आवडले व 'उपकार' चित्रपटातील हे गाणे तयार झाले. गुलशन बावरा हे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्रींचे चाहते होते. १९६७ च्या 'परिवार' चित्रपटातील खालील गाण्यात या दोहोंनाही उद्देशून त्यांनी आपला आदर व्यक्त केला.**

आज है दो अक्टूबर का दिन आज का दिन है बडा महान आजके दिन दो फूल खिले है जिनसे महका हिंदुस्थान... हेही गाणे देशभर गाजले. भरत व्यास या दिग्गज गीतकाराने 'नवरंग' चित्रपटात कवितेवर एक विनोदी विडंबन केले होते. कविराजा कविता के ना कान मरोडो धंदे की कुछ बात करो, कुछ पैसा जोडो. केवळ काव्य करून पोट भरणार नाही. काही धंदा करा व पैसे जोडा. त्या सिनेमातील नायकाला चिडवण्याचा हा प्रकार होता. केवळ सिनेमात गीतकार बनून चरितार्थ चालविणारे अनेक गीतकार सिनेमाने दिलेत. एवढेच नाही, तर मोठमोठ्या पुरस्काराने ते पुरस्कृतही झा-लेत. काही चित्रपट तर केवळ गाण्यांसाठी स्मरणात राहतात. असाच दर्जा व लोकप्रियता गुलशन बावराने प्राप्त केली होता. समाजातील वास्तववादी दर्शन त्यांनी १९५९ सालच्या 'सट्टाबाजार' चित्रपटातील खालील गाण्यात देऊन आपले कवित्व उजागर केले.

चांदीके चंद तुकडोके लिये ईमान को बेचा जाता है, मस्जिद मे खुदा और मंदिर में भगवानको बेचा जाता है या अर्थपूर्ण व भावनाप्रदान गाण्याने कुप्रथेवर ताशेरे ओढले होते. चित्रपटातील प्रसंग गाण्यातील शब्दांमुळे चटकदार झाला होता. गुलशन बावरांच्या या गाण्याने चित्रपटसृष्टीत त्याचा आदर व दर्जा वाढीस लागला. चित्रपट 'विश्वास' (१९६९) मधील खालील गाण्यात भग्न हृदयाच्या व्यथा व कारुण्य आर्ततेने काव्यात गुंफून दर्जेदार काव्याला जन्म दिला आहे. चांदी की दिवार ना तोडी प्यार भरा दिल तोड दिया एक धनवान की बेटीने निर्धन का दामन छोड दिया. हिंदी चित्रपटात अशा कथनकाची वाण नाही, तरीपण कवी आपल्या शब्दकळेने तो प्रसंग नव्या साध्या शब्दाने कसा फुलवितो यावरून गीतकाराचा साहित्यिक दर्जा कळतो. अर्थात हे गाणे गायक मुकेशने आर्त स्वरात गाऊन गीतकाराच्या शब्दांना सजीव केले आहे. 'विश्वास चित्रपट कधी आला व कधी गेला, हे रसिक प्रेक्षक विसरलेही असतील; परंतु गुलशन बावरांनी लिहिलेले हे गाणे विसरणे शक्य नाही.

गुलशन बावरांचे ज्या काळात फिल्मी दुनियेत पदार्पण झाले त्या काळात साहिर लुधियानवी, मजरूह, हसरत जयपुरी, कैफी आझमी, शैलेंद्र, राजेंद्र कृष्ण इ. अनुभवी गीतकार होते. परंतु गुलशनने आपली वेगळी शैली निर्माण करून गीतकाराचा आपला दर्जा प्रस्थापित केला व चित्रपटसृष्टीत योगदान दिले. ७०-८० च्या दशकात शब्दप्रधान गायकी काही अपवाद सोडल्यास हळूहळू विसरायला लागली व वाद्यप्रधान गायकी उदयास येऊ लागली. गुलशनने दोन्ही काळात स्वतःला सिद्ध केले. १२ एप्रिल १९३८ रोजी जुन्या पंजाब (आता पाकिस्तान) प्रांतातील शेखपुरा गावी गुलशन मेहता यांचा जन्म झाला. देशातील फाळणीचे दुःखद चटके यांच्या कुटुंबीयांनी अनुभवले. गुलशन व कुटुंब त्यांच्या वडील बहिणीकडे जयपूरला स्थानांतरित झाले. वडील भावाला दिल्लीला नोकरी मिळाल्यामुळे काही काळाने दिल्लीला आले. १९५५ साली मुंबईत क्लार्कची नोकरी करून चित्रपटासाठी संघर्ष सुरू केला. दिवसभर खर्डेघाशी व सायंकाळी स्टुडिओ व संगीतकारांचे उंबरठे झिजवू लागला. त्याकाळी संगीतकार म्हणून उदयास येत असलेले कल्याणजी वीरजी शाह यांच्याकडे गाणी लिहिण्याचा सराव केला. १९५८ साली कल्याणजींनी 'चंद्रसेना' चित्रपटात संधी दिली. त्याने पहिले गाणे लिहिले... 'मै क्या जाणू, काहे लागे, ये सावन, मतवाला रे' भाग्य उजळले की असे उजळते! कल्याणजीने गुलशनचे वरील गाणे चक्क स्वरकोकिळेकडून गाऊन घेतले. लताने आपले गाणे गायले यापेक्षा मोठा अभिमानाचा विषय तो काय! नशीब उजडायला हे गाणे निमित्त ठरले. १९५९ साली रवींद्र दवे या निर्मात्याने 'सट्टाबाजार' या चित्रपटात गीतकार म्हणून निवडले. तुम्हे याद होगा, कभी हम मिले थे मोहब्बत की राहोमे मिलके चले थे

कल्याणजी-आनंदजींनी लता व हेमंत कुमारच्या आवाजात गुलशनच्या शब्दकळा संगीतसाजात गुंफल्या. हे विरही अवस्थेतील मधूर ड्युएट आजही ऐकले तर हृदयात हुरहूर होते. या गाण्याच्या प्रसिद्धीने गुलशनच्या यशावर शिक्कामोर्तब केले. या बोलपटाचे वितरक शांतिभाई पटेल फार खूश झाले. केवळ २० वर्षे वयाचा गुलशन रंगीबेरंगी कपड्याचा शौकीन होता. केसांचा भांग करण्याकडे लक्ष न देता विस्कटलेल्या केसांनीच वावरायचा. त्याच्या अशा अवतारामुळे शांतिभाई त्याला 'बावरा गुलशन' असे गमतीने म्हणायचे आणि अशारीतीने त्याचे 'गुलशन बावरा' या नावाने पुन्हा बारसे झाले.

मैत्री, रोमान्स, मस्ती, दुःख, देशभक्ती इ. जीवनातील प्रत्येक प्रसंगावर गाणी लिहून बहुआयामित्व सिद्ध केले. गुलशन बावराने २२ चित्रपटात छोट्या-मोठ्या विनोदी भूमिका करून स्वतःची विनोद शैली निर्माण केली. त्यांची चित्रपट कारकीर्द १९५९ ते १९९९ पर्यंत ४० वर्षे होती. 'बोर्ड ऑफ इंडियन परफॉरमिंग राईट सोसायटी'चे ते सात वर्षे निर्देशक होते. २००८ साली गीतकार क्षेत्रात त्यांना किशोरकुमार सन्मानाने विभूषित केले होते. अनेक दिग्गज कलाकारांप्रमाणे गुलशन बावरा मोठ्या पुरस्कारापासून वंचित राहिले. 'मेरे देश की धरती' हे देशभक्तीवर आधारित अजरामर गाणे लिहून देशभरातील जनतेवर 'उपकार' करणारे गीतकार गुलशन बावरा यांची लेखणी ७ ऑगस्ट २००९ रोजी मुंबई मुक्कामी कायमची थांबली. त्यांचे चित्रपटातील योगदान मात्र कायमचे समरणात राहील. 'तुम्हे याद होगा, कभी हम मिले थे...'

**रमेश पोफळी**

# परेश रावल बाबूरावला कंटाळले



बॉलिवूडच्या फ्रेन्चायजी सिनेमांपैकी सगळ्यात गाजलेला तो म्हणजे 'हेरा फेरी'. या सिनेमाचे आत्तापर्यंत 'हेरा फेरी' आणि 'फिर हेरा फेरी' असे दोन भाग प्रदर्शित झाले आहेत. लवकरच 'हेरा फेरी ३'देखील प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचा पहिला भाग हा २००० साली प्रदर्शित करण्यात आला होता. या सिनेमातील परेश रावल यांनी साकारलेलं बाबुराव हे पात्र प्रचंड गाजलं. आजही त्यावरचे कित्येक मीम्स ही सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. पण, हेरा फेरीमधील बाबू भैय्या म्हणजे गळ्याला फास असल्याचं परेश रावल यांनी म्हटलं आहे. परेश रावल यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना हेरा फेरी सिनेमाबद्दल विच-ारलं असता त्यांनी बाबू भैय्यापासून मुक्ती हवी असल्याचं म्हटलं. हेरा फेरी सिनेमा म्हणजे गळ्याला लागलेला फास. २००६ मध्ये हेरा फेरीचा दुसरा भाग (फिर हेरा फेरी) प्रदर्शित झाला होता. २००७ मध्ये मी विशाल भारद्वाज यांच्याकडे गेलो होतो. त्यांना मी म्हणालो होतो की माझ्याकडे एक सिनेमा आहे. मला हेरा फेरीमधील बाबुरावपासून मुक्ती हवी आहे. तुम्ही त्या सेम गेटअपमध्ये मला वेगळा रोल देऊ शकतो का? जो कोणी पण येतो, हेरा फेरीबद्दल बोलतो. मी एक अभिनेता आहे आणि मला या दलदलमध्ये फसायचं नाही. पण, ते मला म्हणाले की मी भूमिकांचे रिमेक करत नाही. त्यानंतर मी २०२२ मध्ये आर बल्की यांच्याकडे गेलो. मी त्यांना म्हणालो की मला याच गेटअपमध्ये दुसरं कोणतं तरी कॅरेक्टर द्या. माझी घुसमट होतेय. आनंद तर आहेच पण, हे तुम्हाला बांधून ठेवतं. यापासून तुम्ह-ाला मुक्ती मिळाली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही जेव्हा सीक्वल करता. तुम्ही तीच गोष्ट पुढे घेऊन जाता. पण, यात कोणालाही नाविन्य करायचं नाही. मी नाही केलं तर हा सिनेमा किंवा प्रोजेक्ट होणार नाही, असं वाटतं. पण यातून मला आनंद मिळत नाही.

# शाहरुख करतो घरातली सगळी कामं



आजपर्यंत शाहरुख खानने अनेक हिट सिनेमे केले. रोमँटिक, ॲक्शन आणि कॉमेडी सर्व प्रकारच्या सिनेमांमध्ये त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. २०१८ च्या 'झिरो' चित्रपटानंतर शाहरुख खान बराच काळ चित्रपटांपासून दूर राहिला आणि चार वर्षे पूर्ण केल्यानंतर तो २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटात दिसला. यानंतर त्याचा 'जवान' चित्रपट प्रदर्शित झाला आणि तोही ब्लॉकबस्टर ठरला आणि त्यानंतर तो 'डंकी'मध्येही दिसला. आता शाहरुख पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये ॲक्टिव्ह झाला आहे, पण जेव्हा तो ब्रेकवर होता तेव्हाही तो 'आस्क मी एनीथिंग' सेशनद्वारे त्याच्या चाहत्यांशी संपर्क साधत होता. शाहरुखने स्वतःबद्दल सांगितले की, जेव्हा तो शूटिंग करत नसतो तेव्हा तो काहीही करत नाही. शाहरूखला मुलाखतीत विचारण्यात आले की, तो त्याच्या रिकाम्या वेळेत काय करतो? त्याने उत्तर दिले, मी सहसा जास्त काही करत नाही. घरी त्याचे रुटीन काय असते? तो म्हणाला, मी घरातील कामं करतो, घर स्वच्छ करण्यास मदत करतो. मी जास्त कामं करणं आणि अति विचार करणं टाळतो. जेव्हा मी सेटवर नसतो तेव्हा मी प्रामाणिकपणे काहीही करत नाही. शाहरुख हा एक फॅमिली मॅन आहे. त्याच्या कुटुंबाबद्दल तो म्हणाला, मी मुलांसोबत खेळतो, पण त्याशिवाय मी दुसरे काहीही करत नाही. या समिटमध्ये शाहरुख इतर अनेक गोष्टींबद्दल बोलला. त्याने करण जोहरच्या एका चित्रपटाबद्दलही सांगितले, ज्यामध्ये त्याला संपूर्ण चित्रपटात स्कर्ट घालण्यास सांगितले गेले होते.

# ...तोपर्यंत मी परफॉर्मन्स करणार नाही



बॉलिवूडची प्रसिद्ध गायिका नेहा कक्कर ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे परफॉर्म करण्यासाठी तब्बल ३ तास उशिरा पोहचली होती. त्यामुळे भडकलेल्या चाहत्यांनी तिला परत जाण्यास सांगितले आणि ती रडली देखील होती. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. आता ऑस्ट्रेलियामध्ये ज्या कंपनीने नेहाचा कॉन्सर्ट आयोजित केला होता. त्यांनी मोठा खुलासा केला आहे. नेहाने ७०० लोकांसाठी परफॉर्म करण्यास नकार दिला. त्यामुळे तिला कॉन्सर्टमध्ये पोहोचण्यास उशीर झाला. तसेच तिला मानधन न दिल्याबद्दल ती खोटे बोलली आहे, असा दावा आयोजकांनी केला आहे. नेहाने खुलासा केला होता की, तिला मेलबर्नमधील तिच्या कॉन्सर्टसाठी पैसे दिले गेले नव्हते. आयोजकांनी टीमला हॉटेल, जेवण किंवा पाणी दिले नव्हते. तिने सर्व व्यवस्था स्वतः केली, ज्यामुळे ती कॉन्सर्टला ३ तास उशिरा पोहोचली. याबद्दल पेस डी आणि बिक्रम सिंग रंधावा यांनी सिद्धार्थ कन्ननशी बोलताना पैसे न मिळाल्याच्या दाव्याचे खंडन केले आणि म्हटले की, 'जर हॉटेल नसते तर ती कुठे राहत होती? ती जी वॅगनमधून प्रवास करत होती त्याच काय? ऑस्ट्रेलियामध्ये कलाकारांना देशात जाण्यापूर्वी पूर्ण पैसे दिले जाणे सामान्य आहे. नेहाने एकाच कंपनीसोबत दोन दिवसांत दोन शो केले. तिचा पहिला शो सिडनीमध्ये होता.

# 'द रॉयल्स' मध्ये दिसणार भूमी पेडणेकर



अभिनेत्री भूमी पेडणेकर प्रत्येक वेळी तिच्या चित्रपटांमध्ये काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करते. यामुळेच ती काही चित्रपटांमध्ये ग्लॅमरस भूमिकेत तर काही चित्रपटांमध्ये पत्रकाराच्या भूमिकेत दिसली. तिने स्वतः कबूल केले आहे की तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला तिला एका वेगळ्या भूमिकेत पाहिले गेले होते आणि आज तिच्या भूमिकांमधील परिवर्तन पाहून ती स्वतः आश्चर्यचकित झाली आहे. 'द रॉयल्स' या मालिकेत, भूमी पेडणेकर एका ग्लॅमरस आणि यशस्वी व्यावसायिक महिलेच्या भूमिकेत दिसणार आहे.

या मालिकेत भूमीशिवाय ईशान खट्टर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ९ मे रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणारी 'द रॉयल्स' ही वेब सीरिज. भूमी आणि ईशान व्यतिरिक्त, नोरा फतेही, साक्षी तन्वर, मिलिंद सोमण, चंकी पांडे, दिनो मोरिया हे कलाकार देखील या सीरिजमध्ये महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. प्रीतिश नंदी कम्युनिकेशन्सच्या बॅनरखाली निर्मित या मालिकेची कथा नेहा वीणा शर्मा यांनी लिहिली आहे. 'दम लगा के हईशा' हा चित्रपट भूमीच्या कारकिर्दीतील पहिला चित्रपट होता. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही मिळाला. हा चित्रपट २०१० च्या मराठी चित्रपट अगडबमपासून प्रेरित आहे, जो २००६ च्या तेलुगू चित्रपट किथाकिथ्लूपासून प्रेरित आहे. या चित्रपटात भूमीसोबत आयुष्मान खुराना दिसला होता. 'टॉयलेट: एक प्रेम कथा' या चित्रपटात अक्षय कुमारने भूमीसोबत महत्त्वाची भूमिका साकारली होती. या चित्रपटात भूमीने एका ग्रामीण महिलेची भूमिका साकारली होती. हा चित्रपट श्री नारायण सिंह यांनी दिग्दर्शित केला आहे. 'सांड की आंख' मध्ये भूमीने एका वृद्ध शूटर महिलेची भूमिका साकारली होती, जी चाहत्यांना खूप आवडली. 'सांड की आंख' हा चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात भूमीने चंद्रो तोमरची भूमिका केली असून तापसी पन्नूने प्रकाशी तोमरची भूमिका साकारली आहे.

'भक्षक' चित्रपटात भूमीने एका पत्रकाराची भूमिका साकारली आहे, जी अनेक बेकायदेशीर कृत्ये उघड करते. भक्त हा मुझफ्फरपूर आश्रय प्रकरणावर आधारित क्राइम थ्रिलर चित्रपट आहे. याचे दिग्दर्शन पुलकित यांनी केले आहे. या चित्रपटात भूमी व्यतिरिक्त संजय मिश्रा, आदित्य श्रीवास्तव आणि सई ताम्हणकर यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.